प्रेस नोट

## 'पीएमआरडीए'त राजमाता जिजाऊ माॅसाहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

पुणे : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) आकुर्डी मुख्यालयात आज (दि. १२) स्वराज्य निर्मितीच्या प्रेरणास्त्रोत राजमाता जिजाऊ माॅसाहेब यांची जयंती, आणि भारतीय तत्त्वज्ञान व आध्यात्म जगभर प्रसारित करणारे युवकांचे प्रेरणास्थान युगाचार्य स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय युवक दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी सहआयुक्त (प्रशासन) रूपाली आवले-डंबे आणि वित्तीय नियंत्रक सविता नलावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या की, “जिजाऊ माॅसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांचे जीवन युवकांना योग्य मार्गदर्शन करणारे असून, त्यांच्या कार्यातून देशभक्ती व आत्मविश्वासाची प्रेरणा मिळते.” याप्रसंगी अभियांत्रिकी विभागाचे उपअभियंता सुधाकर ऐवळे आणि कनिष्ठ अभियंता गणेश सुतार यांनी या महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे अभिवाचन केले.

या कार्यक्रमास उपायुक्त (प्रशासन) राजेश माशेरे, कार्यकारी अभियंता शिवप्रसाद कुपल, माहिती व जनसंपर्क अधिकारी पुरूषोत्तम सांगळे, उपअभियंता (सेवानिवृत्त) सुरेश कानडे, प्रशांत जोशी, अरविंद माळी, तसेच कनिष्ठ अभियंता किरण कोष्टी, गोविंद सरगर, अनुजा सानप, वरिष्ठ लिपिक पांडुरंग मधुरकर, दीपाली तावरे, रवी बोडरे, प्रशासन विभागातील गणपत गोरेकर यांच्यासह पीएमआरडीएतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी जिजाऊ माॅसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या स्मृतींना अभिवादन केले आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

---

**मा. संपादक/प्रतिनिधी,**

कृपया उपरोक्त वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिक, वृत्तवाहिनी किंवा डिजिटल मीडियातून प्रसिद्धीस द्यावे, ही विनंती.

**पुरूषोत्तम सांगळे**

माहिती व जनसंपर्क अधिकारी,

पीएमआरडीए, पुणे